नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ६१ Issue - 61 | वार शुक्रवार दि. १८ जुलै २०२५ Blow- Friday Date 18 July 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# विधानभवनाच्या परिसरात हायव्होल्टेज राडा

## सरकार विरोधात निदर्शने व पोलिसांचा निषेध; परिसरात एकच खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधिमंडळ परिसरात आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांमध्ये झालेल्या राड्याने आता वेगळच वळण घेतलंय. जितेंद्र आव्हाड यांनी काल (१७ जुलै) रात्री २ वाजेपर्यंत विधिमंडळ परिसरात तुफान राडा घालत चांगलाच गदारोळ केल्याचे पाहायला मिळालं. विधानभवनच्या मागच्या गेटवरून आव्हाड यांचा समर्थक नितीन देशमुखला पोलीस घेऊन जात असताना आव्हाड आणि कार्यकर्त्यांनी पोलिसांची कार अडवली आणि ठिय्या आंदोलन केलं. यावेळी मार खाणाऱ्याला पोलिसांकडून अटक केली जात आहे. तर मारहाण करणाऱ्या ५ जणांची पोलिसांकडून पाठराखण केली जात आहे. त्यांना पोलीस वडापाव आणि तंबाखू मळून देत असल्याचा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केलाय.



दरम्यान, या संपूर्ण राड्याची घटना कॅमेऱ्यात कैद झाली असून आता या प्रकरणाचे राजकीय पडसाद देखील उमटण्याची शक्यता आहे. ऐकूणच विधानभवनच्या परिसरात दोन नेत्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेली तुंबळ हाणामारी आणि शिवीगाळमुळे राज्याच्या राजकारणाचा दर्जा ढासळ्याची आता सर्वच स्तरातून टीका होत आहे. तर दुसरीकडे पोलिसांचा कृतीवर आता आमदार जितेंद्र आव्हाड (गळींशपवीर ुहरव) यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत सरकारवर कडाडून टीका केली आहे.

दरम्यान, विधानभवन परिसरात सुमारे तासभर चाललेल्या या राड्यानंतर पोलिसांनी पोलीसी बळाचा वापर करत धरपकड सुरू केली. तर यावेळी आव्हाड हे थेट पोलिसांच्या कार समोर ठिय्या देत होते. यावेळी त्यांनी कार रोखून धरली असता पोलिसांनी अक्षरक्ष: त्यांना फरफटत बाहेर ओढलं. त्यानंतर पोलिसांनी फौज बोलावली आणि कार्यकर्त्यांना व्यस्त ठेवलं. तर दुसरीकडे गपचूप दुसरी गाडी बोलावून कार्यकर्त्याला नेण्याचा प्रयत्न केला. पण त्याच वेळी आमदार आव्हाडांनी हे पाहिलं आणि परत राडा झाला. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे देखील हजार होते.

विधिमंडळाचं अधिवेशन आज (१८ जुलै) संपणार आहे, त्यापूर्वी आदल्या दिवशी विधानसभेत विरोधी पक्षांचा अंतिम आठवडा प्रस्ताव जितेंद्र आव्हाड यांनी मांडला. त्यामध्ये त्यांनी त्यांना नुकताच आमदार गोपीचंद पडळकर यांच्याशी झालेला वाद, त्यानंतर आलेल्या धमक्यांसंदर्भात माहिती दिली. यानंतर थोड्याच वेळात विधानभवनाच्या लॉबीत आव्हाडांचे कार्यकर्ते आणि पडळकरांचे कार्यकर्ते यांच्यात वाद झाला. जितेंद्र आव्हाड या घटनेंतर आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. गोपीचंद पडळकर यांचा कार्यकर्ता ऋषिकेश टकले आणि जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख यांच्यात वाद झाला.

मात्र यात मारहाण करणाऱ्या पडळकरांच्या पाच कार्यकर्त्यांना पोलिसांना सोडून देत जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख याला पकडून पोलीस घेऊन जात असताना आव्हाड आणि कार्यकर्त्यांनी पोलिसांची कार अडवली आणि ठिय्या आंदोलन केलं. यावेळी पोलिसांनी अक्षरक्ष: जितेंद्र आव्हाड यांना बळाचा वापर करत बाजूला केलं. यावेळी सरकार विरोधात निदर्शने आणि या पोलिसांचा निषेध करण्यात आला. सुमारे तासभर सुरू असलेल्या या राड्याने परिसरात एकाच गोंधळ झाल्याचे बघायला मिळाले.

# पडळकरांच्या कार्यकर्त्यांकडून हल्ला, मलाच मारण्यासाठी आलेले सगळे, जितेंद्र आव्हाड यांचा गंभीर आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन वेगळ्याच कारणानं चर्चेत आलं आहे. काल गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्यात वाद झाला होता. आज विधानभवनाच्या लॉबीत जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. विधिमंडळाच्या सुरक्षारक्षकांनी वेळीच धाव घेतल्यानं वाद वेळीच थांबला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे गटनेते जितेंद्र आव्हाड यांनी या प्रकरणावरुन संताप व्यक्त केला. हल्ला कोणी केला हे जोरात बोला, पडळकरांच्या कार्यकर्त्यांनी हल्ला हे संपूर्ण महाराष्ट्राला समजलं असल्याचं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

विधानसभेत जर तुम्ही गुंडांना प्रवेश देणार असाल आणि ते हल्ले करणार असतील तर आमचे जीव सुरक्षित नाहीत. मला आई बहिणीवरुन शिव्या दिल्या आहेत. कुत्रा, डुक्कर अजून काय काय लिहिलं आहे. भाषण करुन बाहेर आलो होतो, मोकळी हवा खाण्यासाठी बाहेर गेलो होतो.हे सगळे मलाच मारण्यासाठी आले होते. विधानसभेत विधिमंडळाच्या पायऱ्यांवर भवनात आमदार सुरक्षित नसतील तर कशाला राहायचं आमदार, काय गुन्हा आहे आमचा, कुणीतरी मवाल्या सारखा येतो, आई बहिणींवरुन शिव्या देतो, त्याला पार्लमेंटरी शब्द करुन टाका, अनपार्लमेंटरी शब्द वापरतात, ते पार्लमेंटरी करुन टाका, सत्तेचा एवढा मुजोरपणा, सत्तेचा एवढा माज, असा तीव्र संताप जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केला.

गोपीचंद पडळकर यांनी या प्रकरणावर भाष्य करताना म्हटलं की त्याला जाऊन भेटाना तो तिथं आहे, असं म्हटलं. मला काही माहिती नाही, तिथं जाऊन बघा, असं पडळकर यांनी म्हटलं. कोण आहे तो मला माहिती नाही, असंही पडळकर यांनी म्हटलं. मारामारीसंदर्भात विचारलं असता पडळकर यांनी माहिती नाही असं म्हटलं.

उद्धव ठाकरे यांनी ते समर्थक आहेत की गुंड आहेत, असा सवाल केला. ही परिस्थिती राज्याची आली असेल तर विधानभवनाला अर्थ काय? ज्यानं पास दिले असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. हा अधिकार अध्यक्षांचा असतो, त्यांची दिशाभूल केली गेली का असा सवाल आहे. अशी गुंडगिरी विधानभवनापर्यंत पोहोचली असेल तर अवघड आहे. गृहमंत्र्यांनी या गुंडांवर आणि गुंडांच्या पोशिंद्यांवर कारवाई केली पाहिजे, तरच तुम्ही राज्याचे तरच पालक, मुख्यमंत्री असण्यास पात्र आहात असं म्हणावं लागेल. दरम्यान, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या प्रकरणाची दखल घेतली आहे. या प्रकरणाचा अहवाल मागवला असून कारवाई करण्याचे आदेश देणार असल्याचं नार्वेकर यांनी म्हटलं.

# आगामी कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी विमानतळावरील प्रस्तावित कामे पूर्ण करा; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शिर्डी आणि पुरंदर विमानतळांच्या कामांसंदर्भात आढावा बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व संबंधित अधिकारी उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस यांनी आगामी कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी विमानतळावरील प्रस्तावित कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळं २०२७ च्या कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी विमानतळावरील प्रस्तावित कामं पूर्ण करावी लागतील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज विधान भवन, मुंबई येथे शिर्डी आणि पुरंदर विमानतळांच्या कामांसंदर्भात आढावा बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध निर्देश दिले.




आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यरत होण्यासाठी नूतनीकरण व विस्तारीकरणाची कामे तातडीने पूर्ण करावीत.

शिर्डी विमानतळावर नवीन एटीसी इमारत, एकात्मिक माल-वाहतूक इमारत व टर्मिनल इमारतीची कामे प्रस्तावित असून ही कामे कुंभमेळ्यापूर्वी पूर्ण होणे आवश्यक आहे. कामांची गती संथ असल्याचे नमूद करून आवश्यक असल्यास अतिरिक्त मनुष्यबळ वापरावे तसेच विमानतळासाठी आवश्यक असणारी खरेदी व स्ट्रक्चरल डिझाईनची कामे येत्या आठवड्यात पूर्ण करावीत.

शिर्डी विमानतळ हे मुंबई व नवी मुंबई विमानतळांच्या जवळचे विमानतळ आहे. येथील लहान विमानांच्या पार्किंगसाठी शिर्डी विमानतळाचा वापर होऊ शकतो. यासाठी शिर्डी विमानतळावर आवश्यक सुविधा उभारण्यासाठी आवश्यक असल्यास अतिरिक्त जमीन संपादित करण्याची प्रक्रिया हाती घ्यावी.

या बैठकीत पुरंदर विमानतळ प्रकल्पाचा आढावा घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, प्रकल्पासाठी सर्वेक्षण पूर्ण झाले असून पुणे जिल्हाधिकारी यांनी तातडीने जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सुरू करावी, जेणेकरून विमानतळाचे काम लवकर सुरू होईल. हे विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर महाराष्ट्रातील विमानसेवा अधिक सक्षम होईल.

दरम्यान, नाशिकमध्ये दर १२ वर्षांनी होणारा कुंभमेळा २०२७ मध्ये होणार आहे. त्यानिमित्तानं राज्य सरकारकडून जोरदार पूर्वतयारी सुरु करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकमधील कुंभमेळ्याच्या तयारीच्या निमित्तानं विशेष लक्ष घातलेलं आहे.

# पंढरपूरातील २१३ सफाई कामगारांना ६०० चौरस फुटांची घरे : उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सुधारित पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून त्यामध्ये पंढरपूर शहरातील सफाई कामगारांसाठी सदनिका बांधकामांचा समावेश आहे.या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह काही लोकप्रतिनिधींकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार पंढरपूर शहरातील २१३ सफाई कामगारांना प्रत्येकी ६०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येतील. त्यासाठी ५५ कोटी ६१ लाख रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना ते बोलत होते.

पंढरपूर शहरातील सफाई कामगारांना घरे देण्याच्या प्रकल्पामध्ये एकूण १३ इमारती आणि २१३ रहिवासी युनिट आहेत. या १३ इमारतींपैकी १२ इमारती ४ मजली असून, एक इमारत ५ मजली आहे. त्यामध्ये रस्त्यालगत असलेल्या ७ इमारतींमध्ये २४ दुकानांचे गाळे आहेत. या सफाई कामगारांना लवकरात लवकर घरे देण्याच्या दृष्टीने आजच स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सोलापूर जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात येईल आणि त्यांना योग्य ते निर्देश देण्यात येतील.

या सफाई कामगारांच्या प्रलंबित घरांचा प्रश्न तातडीने निकाली काढण्यात येईल आणि त्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

राज्य सरकारने प्रशासनात महत्त्वाचे केले बदल

प्रशासकीय विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका सुरुच

# राज्यात २० अधिकाऱ्यांच्या बदल्या, अनेकांना आयएसएस पदोन्नती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य सरकारने प्रशासनात महत्त्वाचे बदल केले आहे. राज्यातील २० अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. महायुती सरकारकडून प्रशासकीय विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका सुरुच ठेवला आहे. गेल्या सहा ते सात महिन्यांपासून राज्यातील अधिकाऱ्यांच्या बदल्याचं सत्र सुरुच आहे. जाणून घेऊयात कोणत्या अधिकाऱ्याची नेमकी कुठे झाली बदली.

**२० अधिकाऱ्यांच्या बदल्या, कोणाची कुठे झाली बदली?**

१. एम.एम.सूर्यवंशी (आयएएस:एससीएस: २०१० ) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांची वसई-विरार महानगरपालिका वसई येथे महानगरपालिका आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.


२. दीपा मुधोळ-मुंडे (आयएएस:आरआर: २०११) अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड पुणे यांची पुण्यात समाज कल्याण आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

३. श्री नीलेश गटणे (आयएएस:एससीएस: २०१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे यांची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

४. श्री ज्ञानेश्वर खिलारी (आयएएस:एससीएस:२०१३) संचालक, ओबीसी, बहुजन कल्याण, पुणे यांची अतिरिक्त सेटलमेंट आयुक्त आणि अतिरिक्त संचालक, भूमी अभिलेख, पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

५. श्री अनिलकुमार पवार (IAS:SCS: २०१४) महानगरपालिका आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका, वसई यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, चचठडठ ठाणे इथं नियुक्त करण्यात आली आहे.

६. श्री सतीशकुमार खडके (IAS:SCS: २०१४ ) संचालक (आपत्ती व्यवस्थापन), महसूल आणि वन विभाग, मंत्रालय मुंबई यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे इथं नियुक्त करण्यात आले आहे.



७. श्री भालचंद्र चव्हाण (IAS: नॉन-SCS: २०१९) आयुक्त, भू-सर्वेक्षण विकास संस्था, पुणे यांची संचालक (आपत्ती व्यवस्थापन), महसूल आणि वन विभाग, मंत्रालय, मुंबई इथं नियुक्त करण्यात आले आहे.

८. श्री. सिद्धार्थ शुक्ला (IAS:RR: २०२३) दिनांक ०२.०७.२०२५ च्या आदेशात बदल करुन सहाय्यक जिल्हाधिकारी, गोडपिंपरी उपविभाग, चंद्रपूर यांना प्रकल्प अधिकारी म्हणून खढऊझ, धारणी आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, धारणी उपविभाग, अमरावती म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

९. श्री. विजयसिंह शंकरराव देशमुख (अतिरिक्त जिल्हाधिकारी खड वर बढती) अतिरिक्त आयुक्त-२, छत्रपती संभाजीनगर विभाग यांची अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, मुंबई येथे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१०. श्री. विजय सहदेवराव भाकरे (अतिरिक्त जिल्हाधिकारी खड पदावर बढती) अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, भंडारा यांची सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ नागपूर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

११. श्री.त्रिगुण शामराव कुलकर्णी (अतिरिक्त जिल्हाधिकारी खड वर बढती) अतिरिक्त महासंचालक, चएऊ, पुणे यांची यशदा, पुणे येथे उपमहासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१२. श्री. गजानन धोंडीराम पाटील (अतिरिक्त जिल्हाधिकारी खड पदावर बढती) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

१३. श्री. पंकज संतोष देवरे (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस) अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, लातूर यांची पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड, पुणे येथे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१४. श्री. महेश भास्करराव पाटील (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस म्हणून पदोन्नती) अतिरिक्त विभागीय आयुक्त (महसूल) पुणे विभाग यांची आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे इथं आयुक्त, म्हणून नियुक्त करण्यात आली आहे.

१५. श्रीमती मंजिरी मधुसूदन मानोलकर (अतिरिक्त जिल्हाधिकारी, आयएएस म्हणून बढती) सहआयुक्त, (पुनर्वसन), नाशिक विभाग, नाशिक यांची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१६ . श्रीमती. आशा अफझल खान पठाण (अतिरिक्त जिल्हाधिकारी खड पदावर बढती) सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर यांची सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

१७. श्रीमती राजलक्ष्मी सफिक शाह (अतिरिक्त जिल्हाधिकारी खड वर बढती) अतिरिक्त विभागीय आयुक्त (जनरल), कोकण विभाग, मुंबई यांची व्यवस्थापकीय संचालक, चतखच्, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१८. श्रीमती सोनाली नीळकंठ मुळे (अतिरिक्त जिल्हाधिकारी खड पदावर बढती) अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, अमरावती यांची संचालक, जइउ, बहुजन कल्याण, पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

१९. श्री.गजेंद्र चिमंतराव बावणे (अतिरिक्त जिल्हाधिकारी खड पदावर बढती) अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, बुलढाणा यांची आयुक्त, भू सर्वेक्षण विकास संस्था, पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

२०. श्रीमती प्रतिभा समाधान इंगळे (अतिरिक्त जिल्हाधिकारी खड पदावर बढती) अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, सांगली यांची आयुक्त, अल्पसंख्याक विकास, छत्रपती संभाजी नगर या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### विधानभवनात राडा

विधिमंडळाचं अधिवेशन १८ जुलै संपणार आहे, त्यापूर्वी आदल्या दिवशी विधानसभेत विरोधी पक्षांचा अंतिम आठवडा प्रस्ताव जितेंद्र आव्हाड यांनी मांडला. त्यामध्ये त्यांनी त्यांना नुकताच आमदार गोपीचंद पडळकर यांच्याशी झालेला वाद, त्यानंतर आलेल्या धमक्यांसंदर्भात माहिती दिली. यानंतर थोड्याच वेळात विधानभवनाच्या लॉबीत आव्हाडांचे कार्यकर्ते आणि पडळकरांचे कार्यकर्ते यांच्यात वाद झाला. जितेंद्र आव्हाड या घटनेंतर आक्रम क झाल्याचं पाहायला मिळालं. गोपीचंद पडळकर यांचा कार्यकर्ता ऋषिकेश टकले आणि जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख यांच्यात वाद झाला. मात्र यात मारहाण करणाऱ्या पडळकरांच्या पाच कार्यकर्त्यांना पोलिसांना सोडून देत जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख याला पकडून पोलीस घेऊन जात असताना आव्हाड आणि कार्यकर्त्यांनी पोलिसांची कार अडवली आणि ठिय्या आंदोलन केलं. यावेळी पोलिसांनी अक्षरक्ष: जितेंद्र आव्हाड यांना बळाचा वापर करत बाजूला केलं. यावेळी सरकार विरोधात निदर्शने आणि या पोलिसांचा निषेध करण्यात आला. सुमारे तासभर सुरू असलेल्या या राड्याने परिसरात एकाच गोंधळ झाल्याचे बघायला मिळाले. दरम्यान उद्धव ठाकरे यांनी ते समर्थक आहेत की गुंड आहेत, असा सवाल केला. ही परिस्थिती राज्याची आली असेल तर विधानभवनाला अर्थ काय? ज्यानं पास दिले असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. हा अधिकार अध्यक्षांचा असतो, त्यांची दिशाभूल केली गेली का असा सवाल आहे. अशी गुंडगिरी विधानभवनापर्यंत पोहोचली असेल तर अवघड आहे. गृहमंत्र्यांनी या गुंडांवर आणि गुंडांच्या पोशिंद्यांवर कारवाई केली पाहिजे, तरच तुम्ही राज्याचे तरच पालक, मुख्यमंत्री असण्यास पात्र आहात असं म्हणावं लागेल. दरम्यान, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वे कर यांनी या प्रकरणाची दखल घेतली आहे. या प्रकरणाचा अहवाल मागवला असून कारवाई करण्याचे आदेश देणार असल्याचं नार्वेकर यांनी म्हटलं.

# नागपूरमधील विधानभवनाची विस्तारीत इमारत भव्य दिव्य असेल : विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नागपूरमधील विधानभवनच्या इमारतीचे विस्तारीकरण व प्रस्तावित नव्या प्रशासकीय इमारतीच्या आराखड्याचे आज सादरीकरण करण्यात आले. विस्तारीकरण व प्रस्तावित इमारतीचे काम भव्यदिव्य असे व्हावे, असे विधानसभा अध्यक्ष ड. राहूल नार्वेकर यांनी यावेळी सांगितले.




यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले आदी उपस्थित होते. वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी आराखड्याचे सादरीकरण केले.

नागपूरमधील सध्या अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या जागेवर नवीन सात मजल्याचे संकुल उभारण्यात येणार असून हे विस्तारीकरण करताना सध्याच्या इमारतीची ऐतिहासिक शैली अबाधित राहिल, याची काळजी घेण्यात येणार आहे. विस्तारीकरणामध्ये एकाच इमारतीत सेंट्रल हॉल, विधानसभा, विधानपरिषद सभागृह, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, विधानपरिषद सभापती, विरोधी पक्ष नेते यांचे दालन आदी असणार आहेत. तर शेजारीच मंत्रिमंडळ सदस्यांसाठी वेगळी सहा मजल्याची इमारत उभारण्यात येणार आहे. तसेच वाहनतळ, उपहारगृह, अभ्यागत कक्ष, सुरक्षा कक्ष आदी सुविधा असणार आहेत. तसेच शासकीय मुद्रणालयाची जागा विधीमंडळास मिळाली असून या जागेवर मंत्रालयीन प्रशासकीय कार्यालयांसाठी सुमारे चार लाख चौ.फुटाची चौदा मजली भव्य दिव्य अशी इमारत उभारण्यात येणार आहे. विधानभवन परिसर व प्रस्तावित प्रशासकीय इमारत यांना भुयारी टनेलने जोडण्यात येणार आहे.

नागपूरमधील विधानभवनाच्या इमारतीचे विस्तारीकरण व प्रस्तावित नव्या प्रशासकीय इमारतीचे काम महाराष्ट्र पायाभूत सुविधा महामंडळाच्या मार्फत करण्यात येणार आहे. महामंडळाने यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष ड. नार्वेकर यांनी यावेळी दिले.

विधानभवनाचे विस्तारीकरण व नवीन इमारत बांधताना हरित इमारतीची संकल्पना राबविण्यात यावी. विधानभवनाच्या प्रस्तावित विस्तारीकरणामध्ये अभ्यागतांसाठी पुरेशी जागा तसेच उपहारगृहाची सोय असावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस अलंकार



पंढरपूर/प्रतिनिधी : **श्री विठ्ठल** : सोने मुकुट, मोत्याचा तुरा, कौस्तुभ मणी, हिऱ्याचा कंगनजोड, दंडपेट्याजोड, नाम हिऱ्याचा, शिरपेच, मोत्याची कंठी, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, तोडे जोड, तुळशीची माळ, मत्स्य जोड इत्यादी

**श्री रुक्मिणी माता** : सोने मुकुट, वाक्या जोड, तोडेजोड, तांबडी चिंचपेटी, जवं मणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मी हार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी

## महाराष्ट्र वकील संरक्षण कायद्यास मंजुरी द्या : आ. समाधान आवताडे



पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानभवनात उपस्थित असताना, राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे राज्यातील वकील बांधवांच्या विविध समस्या मांडत महाराष्ट्र वकील संरक्षण कायद्यास मंजुरी देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.

महाराष्ट्रात सुमारे दोन लाख वकील बांधव व भगिनी बार असोसिएशन कौन्सिलच्या माध्यमातून कार्यरत आहेत. पक्षकार व समाजकंटकांकडून त्यांना सातत्याने मारहाण, जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जातात. तसेच, त्यांच्याकडून खंडणीची मागणी केली जाते. या मागण्या पूर्ण न झाल्यास त्यांच्यावर सातत्याने जीवघेणे हल्ले होत असतात. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना आळा घालण्याची गरज आहे.

देशातील अनेक राज्यांमध्ये वकील संरक्षण कायदा पारित करण्यात आला असून या कायद्याच्या माध्यमातून वकिलांना संरक्षण देण्यात आले आहे. त्याच पद्धतीने, महाराष्ट्र राज्य व गोवा राज्यात वकील संरक्षण कायदा मंजूर करण्याकरिता मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर केले.

## सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा; आ. अभिजीत पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा मतदारसंघातील विद्यमान आमदार अभिजीत आबा पाटील यांनी पावसाळी अधिवेशनात सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न अधिवेशनात मांडून आवाज उठविला असून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. दि. १६जुलै रोजी महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाने काढलेल्या शासन निर्णयानुसार सोलापूर जिल्ह्यात मे२०२४ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या शेती नुकसानीसाठी राज्य शासनाने रु. ४४९.०६ लाखांचा निधी मंजूर केला आहे.

हा निधी २७४८ बाधित शेतकऱ्यांच्या १९७६.६७ हेक्टर क्षेत्रासाठी मंजूर करण्यात आला असून, लाभार्थ्यांच्या थेट खात्यात उद्धढ प्रणालीद्वारे रक्कम जमा केली जाणार आहे. या निर्णयामागे आमदार अभिजीत आबा पाटील यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि शासन दरबारी प्रभावी मागणी महत्त्वाची ठरली. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी त्यांनी वेळोवेळी विभागीय आयुक्त आणि महसूल विभागाकडे पाठपुरावा करून प्रशासनाच्या लक्षात ही गरज आणून दिली.

या निधीमुळे सोलापूर जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार



असल्याचेश आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले..

## उद्याच अहवाल येईल, फौजदारी कारवाई करणार : नार्वेकर

मुंबई : विधिमंडळ परिसरात आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांमध्ये झालेल्या राड्यावरुन चांगलाच गदारोळ पाहायला मिळालं. थेट विधानसभेच्या लॉबीतच दोन्ही आमदारांचे समर्थक भिडल्याने आमदार आणि कार्यकर्त्यांतेही गोंधळून गेले होते. अखेर, तेथील सुरक्षा रक्षकांनी पुढे येऊन हा वाद सोडवला, मात्र या वादाचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने संबंधितांवर कारवाईचा प्रश्न उपस्थित झाला आहे. याप्रकरणी, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी ह्या गुंडांना पास देणाऱ्यांवरच कारवाई करावी, अशी मागणी केली. तर, मी विधानसभा अध्यक्षांकडे योग्य ती कारवाई करण्याची विनंती केल्याचं मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. आता, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर (ठर्हीश्र परींशिझरी) यांनी प्रतिक्रिया देत फौजदारी कारवाई करणार, असे म्हटलं आहे.

विधानभवन परिसरात झालेल्या घटनेनंतर भाजप नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गोपीचंद पडळकरांना बोलावून घेतले होते. दरम्यान, येथील सुरक्षा रक्षकांनी दोघांनाही ताब्यात घेतलं आणि दोघांचेही जबाब नोंदवून घेतले आहेत. त्यानंतर राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील अणि जितेंद्र आव्हाड मुख्यमंत्र्यांना भेटायला गेले आणि त्यांना सगळ्या घटनेची माहिती दिली. हे सगळं घडत असताना गोपीचंड पडळकर विधिमंडळात परतले आणि बावनकुळेंना भेटायला गेले. गोपीचंद पडळकर आणि चंद्रशेखर बावनकुळे यांची बैठक १० मिनिटांत संपली आणि पडळकरांनी बाहेर येऊन दिलगिरी व्यक्त केली आणि विधीमंडळातून ते निघून गेले.

**सागरी शिखर परिषद २०२५ ला उत्स्फूर्त प्रतिसाद**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# वाढवण बंदरामुळे भारताची सागरी महासत्तेकडे वाटचाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वाढवण बंदराच्या उभारणीमुळे महाराष्ट्र आणि भारत सागरी महासत्ता होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत असून, हा प्रकल्प केवळ बंदर नव्हे तर एक आर्थिक क्रांती घडवून आणणारा केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

राज्य शासनाच्या मत्स्य व्यवसाय व बंदरे विभाग आणि महाराष्ट्र सागरी मंडळाच्या वतीने आयोजित सागरी शिखर परिषद २०२५ चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे, परिवहन व बंदरे विकास विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, उद्योग विभागाचे सचिव पी अन्बलगन, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी., जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटीचे अध्यक्ष उमेश वाघ आदी उपस्थित होते.

**'भारत मेरीटाईम व्हिजन २०३०' आणि 'अमृतकाल मेरीटाईम व्हिजन २०४७' मध्ये महाराष्ट्राचा सहभाग**

केंद्र सरकारच्या मेरीटाईम व्हिजनचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भविष्यात भारत हा जागतिक सप्लाय चेनमधला महत्त्वाचा भागीदार बनू शकतो. म्हणूनच केंद्र सरकारने 'इंडिया मेरीटाईम व्हिजन २०३०' आणि 'अमृतकाल मेरीटाईम व्हिजन २०४७' तयार केले आहेत. या दोन्ही व्हिजनचा अभ्यास करून, महाराष्ट्रासाठी एक मजबूत मेरीटाईम व्हिजन तयार करण्याचे आपले उद्दिष्ट आहे. या धोरणासाठी आजच्या चर्चासत्रातील सर्व शिफारशी संकलित करून आम्ही त्या अमलात आणू.

मुंबई ही आपली आर्थिक, व्यावसायिक, मनोरंजन आणि आर्थिक राजधानी आहे. मुंबईला भारताचे आर्थिक इंजिन बनवणारे मुंबई पोर्ट आणि जेएनपीटी पोर्ट ही बंदरे आहेत. ही दोन बंदरे मुंबईला आघाडीवर घेऊन आली. आता आपण जागतिक सप्लाय चेनमध्ये शक्ती बनण्याचा संकल्प करत आहोत, त्यामुळे बंदरांची क्षमता, कार्यक्षमता आणि कनेक्टिव्हिटी वाढवावी लागेल, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रात आमचे सरकार आल्यावर वाढवण बंदरासाठी पुन्हा नव्याने प्रयत्न हाती घेण्यात आले. प्रारंभी प्रकल्प १००% महा पोर्टकडे होता, परंतु, त्याचा व्याप पाहता केंद्र सरकारला प्रमुख भागीदार करण्यात आले. वाढवण बंदर पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवेल. भारत सध्या जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे आणि महाराष्ट्र हे नेतृत्व करण्यास तयार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**ऑफशोअर विमानतळ आणि मल्टिमोडल कनेक्टिव्हिटी**

भारताचे पहिले 'ऑफशोअर विमानतळ' वाढवण बंदराशेजारी उभारले जात आहे. यामुळे जलमार्ग, रेल्वे, रस्ता आणि हवाई मार्गांची मल्टिमोडल जोडणी मिळेल. यासाठी सागरमाला प्रकल्पांतर्गत केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे. महाराष्ट्रात जलवाहतूक, शिपबिल्डिंग आणि शिप रीसायकलिंगसाठी मोठी संधी आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

वाढवण बंदराला जोडणारे रेल्वे जाळे तयार करण्याचाही प्रयत्न करत करण्यात येत आहे. सागरमाला प्रकल्पामुळे ही कनेक्टिव्हिटी खूपच सोपी झाली आहे. वाढवण पोर्टवर मल्टी-मोडल कार्गो हाताळणी क्षमता निर्माण होईल. नॉन-मेजर पोर्ट्सही अधिक कार्यक्षम बनवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कारण त्यांचेही महत्त्वाचे योगदान आहे. भविष्यात आपण केवळ कार्गो हाताळणीपुरते मर्यादित राहणार नाही, तर शिपबिल्डिंग, शिप रीसायकलिंग, वॉटर ट्रान्सपोर्टच्या दिशेने जाऊ शकतो. महाराष्ट्रात विशेषतः मुंबई-नवी मुंबई भागात जलवाहतुकीची खूप मोठी संधी आहे. यामुळे नागरिकांचे जीवनमान खूप सुकर होऊ शकते, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**समृद्धी महामार्गमुळे जलद मालवाहतूक आणि २४ जिल्ह्यांचा थेट लाभ**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, समृद्धी महामार्गामुळे १५-१६ जिल्ह्यांना जेएनपीटी बंदराशी जलद जोडणी मिळाली असून, जिथे माल पोहोचण्यासाठी ६-७ दिवस लागत होते, तिथे आता तो प्रवास १० तासांपेक्षा कमी वेळेत होतो. वाढवण बंदरालाही 'ऍक्सेस कंट्रोल्ड' रस्त्यांद्वारे समृद्धी महामार्गाशी जोडण्यात येत आहे, ज्यामुळे २४ जिल्ह्यांना थेट बंदर कनेक्टिव्हिटी मिळणार आहे.

कोकणातील पारंपरिक बंदरांचा इतिहास सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोकणातील काही बंदरे ५००-६०० वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी प्रसिद्ध होती. त्या गौरवशाली इतिहासाला पुन्हा उजाळा देत आहोत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि ती बंदरांमुळे आर्थिक इंजिन झाली आहे.

**महाराष्ट्राला मेरीटाईम क्षेत्रात आघाडीवर नेणारे पाऊल - बंदरे विकास मंत्री नितेश राणे**

यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे म्हणाले की, मेरिटाईम समिट हे शिखर संमेलन केवळ एक कार्यक्रम नाही, तर महाराष्ट्राला देशाच्या मेरीटाईम क्षेत्रात आघाडीच्या स्थानी नेण्यासाठी घेतलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली, भारत जागतिक मेरीटाईम हब होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. राज्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गतिशील नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या समुद्रकिनारपट्टी आणि मेरीटाईम क्षमतेचा जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी दिशा मिळाली आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या सागरी किनारपट्टीचा वापर करत बंदराधिष्ठित विकास, सागरी उत्पादन आणि किनारपट्टी वाहतुकीस चालना दिली आहे. महाराष्ट्र हे भारताच्या आर्थिक प्रगतीचे इंजिन आहे. अरबी समुद्र ही केवळ आपली भौगोलिक सीमा नाही, तर ती एक संधीने भरलेली अमर्याद शक्ती आहे, असे मंत्री राणे यांनी सांगितले.

आपला दृष्टिकोन केवळ क्षमतेच्या वाढीपुरता मर्यादित नाही, तर तो शाश्वततेवर आधारित आहे. ग्रीन लॉजिस्टिक्स, मल्टीमोडल इंटिग्रेशन, आणि किनारी समुदायांचे सबलीकरण हे सागरी धोरणाचे मुख्य भाग आहेत. आज महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्प म्हणजे वाढवण बंदर. हे कार्यान्वित झाल्यावर, जगातील सर्वोच्च १० खोल समुद्र बंदरांपैकी एक ठरेल. येथे उच्च दर्जाचे कंटेनर हाताळणी, खोल पाण्याची उपलब्धता आणि जागतिक दर्जाची लॉजिस्टिक्स सुविधा असेल. हे बंदर महाराष्ट्रासाठीच नाही, तर भारताच्या जागतिक व्यापारातल्या भूमिकेसाठीही गेमचेंजर ठरेल, असा विश्वास मंत्री राणे यांनी यावेळी व्यक्त केला.

नेदरलँड्स दौऱ्यामुळे आंतरराष्ट्रीय संधी खुल्या झाल्या आहेत. या दौऱ्यात अनेक संस्थांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येणार आहे. तसेच राज्यातील सहा 'आयटीआय'चे आधुनिककरण होणार असून त्याद्वारे दरवर्षी ७,००० युवकांना आधुनिक सागरी कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र सरकारने 'शिपबिल्डिंग, शिप रिपेअर व शिप रीसायकलिंग पॉलिसी २०२५' जाहीर केली. या धोरणांतर्गत प्रकल्पांना भांडवली अनुदान, कौशल्य विकासासाठी वित्तीय प्रोत्साहन, जलद परवानगी प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असेही मंत्री राणे यांनी सांगितले.

महाराष्ट्र भारताच्या मेरीटाईम परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी तयार असून आपल्याकडे धोरण, जमीन, पायाभूत सुविधा आणि नेतृत्व आहे. आता भागीदार हवे असून यासाठी हे समिट महत्वाचे असल्याचे मंत्री राणे यांनी सांगितले.

सेठी यांनी प्रास्ताविकात राज्यातील बंदर विकासात करण्यात येत असलेल्या पायाभूत सुविधा, कनेटीव्हीटी याबद्दल माहिती दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शासकीय धान्य गोदामातील कामगारांचे थकीत पगार करा

## आ.अभिजीत पाटलांनी उठविला आवाज; कामगारमंत्र्यांकडून दखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी :- सोलापूर जिल्ह्याबरोबरच संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय धान्य गोदामातील हमाल कामगारांचे पगार कित्येक वर्षांपासून थकीत आहेत. ते पगार लवकरात लवकर करण्यासाठी प्रश्नोत्तरच्या कालावधीत विधानभवनात शासकीय धान्य गोदामातील कामगारांचे पगार कधी मिळणार यावर आमदार अभिजीत पाटील यांनी प्रश्न उपस्थित करून कामगारांचे पगार लवकर करण्याची मागणी केली.

याविषयी आमदार अभिजीत पाटील यांनी सोलापूर जिल्हा धान्य गोदामातील नोंदणीकृत कामगारांचे लेव्हीसह पगार प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत माथाडी बोर्डात भरणा करणे आवश्यक आहे. परंतू चालू पगार जानेवारी २०२५ पासून तर पंतप्रधान मोफतमधील सन २०२१-२२ पासून आतापर्यंत झाले नाहीत. हातावर पोट असणार्या कामगारांना पगार वेळेत न झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे विधानभवनामध्ये आमदार पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या सत्रात कामगारांचे पगार कधी मिळणार यावर प्रश्न उपस्थित करून मंत्री महोदयांनी लवकरात लवकर त्यांचे पगार करावेत अशी मागणी केली.


आमदार अभिजीत पाटील यांनी शासकीय धान्य गोदामातील हमाल कामगारांच्या थकीत पगाराबद्दल प्रश्न उपस्थित केल्याबद्दल आ.अभिजीत पाटील यांचे महाराष्ट्र राज्य हमाल-मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ.बाबा आढाव, सोलापूरचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव शिंदे तसेच सर्व शासकीय धान्य गोदामातील कामगारांनी अभिनंदन केले आहे.

### पुरवठा अधिकाऱ्यांची बैठक लावणार

**याबाबत बोलताना कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी, हा प्रश्न व्यापक असून संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय धान्य गोदामातील कामगारांचा आहे. आमदार अभिजीत पाटील यांनी मांडलेला हा प्रश्न अत्यंत ज्वलंत आहे. राज्यातील अनेक शासकीय धान्य गोदामातील कामगारांचे पगार देणे बाकी आहे. या संदर्भात पुरवठा विभागातील अधिकार्यांची बैठक घेवून लवकरच हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.**

# मेहतर समाजाच्या २१३ लोकांच्या कुटुंबीयांसाठी सदनिकांचे बांधकाम पूर्ण करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरात वारीच्या निमित्ताने लाखो भाविक दरवर्षी येतात. या भाविकांचे तसेच तेथील रहिवाशांचे आरोग्य चांगले राहावे, या हेतूने १८८९ साली मेहतर समाज पंढरपुरात साफसफाईसाठी आणला गेला. या मेहतर समाजातील २१३ लोकांच्या कुटुंबीयांसाठी सदनिकांचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव होता. हा प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या समितीकडून आयुक्तांकडे गेला होता आणि आयुक्त समितीने त्याला मंजुरी देऊन शासनाकडे पाठवला. मात्र, तो प्रस्ताव अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे.

१८८९ सालापासून पंढरपूरच्या स्वच्छतेत मेहतर समाजाचे योगदान आहे, जे आजही अविरतपणे कार्यरत आहेत. या मेहतर समाजाच्या सदनिकांच्या प्रश्नांची सोडवणूक विहित वेळेत होणार का? आणि किती दिवसात या प्रश्नाची सोडवणूक होऊन या २१३ कुटुंबियांना सदनिका बांधून मिळणार? महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात यासंबंधी प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे व मंत्री महोदयांचे लक्ष वेधले.

या अनुषंगाने, सकारात्मक प्रतिसाद देत, वित्त व नियोजन मंत्री तथा उपमुख्यमंत्री मा.श्री. अजितदादा पवार यांनी सुधारित पंढरपूर तीर्थक्षेत्र आराखड्यामध्ये या प्रकल्पाचा समावेश केला असून या आराखड्यात एकूण १३ इमारती उभारण्यात येणार असून, त्यापैकी १२ इमारती ४ मजली, तर १ इमारत ५ मजली असेल. यामधील ७ इमारतींमध्ये एकूण २४ गाळे काढण्यात येणार आहेत.

यासोबतच, विधीमंडळाचे कामकाज संपल्यानंतर सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून, संपूर्ण आराखड्यातील हा प्रश्न लवकरच मार्गी लावण्यासाठी चर्चा केली जाईल, असे स्पष्ट केले.

### 'इमोजी डे' तून चिमुकल्यांचा भावनाविष्कार

# वैनतेय विद्यामंदिरात 'जागतिक इमोजी दिन' उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : - फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉटसप या सोशल मिडीया प्लेटफॉर्मवर कमी वेळेमध्ये आणि कमी शब्दात बोलायचे झाले तर 'इमोजी' या सांकेतिक भाषेचा वापर केला जातो.१७ जुलै हा जागतिक इमोजी दिवस म्हणून साजरा केला जातो त्यानिमित्ताने वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर निफाड शाळेतील शिक्षक गोरख सानप यांनी विविध इमोजी चे मुकुट तयार करून आगळा-वेगळा इमोजी डे साजरा केला.

राग, भिती, आनंद, दु:ख, आळस,लबाडी, झोप, प्रेम, हसणे, रडणे यांसारख्या असंख्य भावना दर्शविण्याचे काम इमोजीतून केले जाते. नवीन अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकात देखील विद्यार्थ्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी इमोजींचा वापर करण्यात आला आहे. सानप यांनी अशा विविध भावना व्यक्त करणा-या इमोजीचे मुकुट तयार केले. मुकुट परिधान करून विद्यार्थ्यांनी एकमेकांच्या चेह-यावरील भावना ओळखून नाट्यीकरण, पाठांतर, हावभाव अशा विविध कृतीतून आपला भावनाविष्कार सादर करत आनंदोत्सव साजरा केला.

विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासासाठी आनंददायी पद्धतीने राबविलेल्या या उपक्रमाचे न्या रानडे विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त मंडळ मुख्याध्यापिका व पालकांनी कौतुक केले.

जाणून घेऊया इमोजीविषयी

इमोजी हा एक जपानी शब्द आहे. इ म्हणजे चित्र आणि मोजी म्हणजे पात्र यांच्या एकत्रीकरणातून 'इमोजी'शब्द तयार झाला आहे.

जपानी कलाकार शिगताका कुरिता यांनी १९९९ मध्ये सर्वात प्रथम इमोजी बनवल्या.

जगामध्ये २६६६ पेक्षा जास्त इमोजी बनवल्या गेल्या आहेत. बहुतेक इमोजी पिवळ्या रंगामध्ये बनवल्या आहेत. फेसबुक पोस्टमध्ये दररोज ७०० दशलक्ष पेक्षा जास्त इमोजी वापरल्या जातात.

आनंदाश्रू व ब्लोईंग किस आणि हसणा-या चेह-याचा स्माईली या इमोजी भारतात सर्वाधिक वापरल्या जातात. मानवी भावना व्यक्त करण्याचे इमोजी प्रभावी साधन आहे. इमोजी शिवाय सोशल मिडीया अपूर्ण आहे.

# स्वेरीच्या तीन विद्यार्थ्यांची 'पोझीट सोर्स टेक्नोलॉजी' या कंपनीत निवड






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'पोझीट सोर्स टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीने घेतलेल्या कॅम्पस निवड प्रक्रियेतून स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या तीन विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांनी दिली.

'पोझीट सोर्स टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून ऐश्वर्या अशोक खुळे, वैभवी व्यंकटेश उपाध्ये व महादेव हनुमंत वाघमारे या तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास आणखी दृढ होत आहे.

'पोझीट सोर्स टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड' ही आयटी क्षेत्रातील एक नामांकित कंपनी आहे. अशा नामांकित कंपन्यांमध्ये संधी मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वेरी मध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ॲप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्स टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनींग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते.

सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील तज्ञ प्राध्यापकांचे व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषत: पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या तिन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वारकरी साहित्य परिषदेच्या बैठकिस उपस्थित राहावे : हभप. चौरे महाराज

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.

कळंब/प्रतिनिधि : धाराशिव जिल्ह्यातील वारकरी साहित्य परिषद अंतर्गत जनाई - मुक्ताई - बहिनाई महिला हरिपाठ मंडळाचा विस्तार करण्यासाठी जिल्हास्तरावर व्यापक स्वरूपाची बैठक आयोजित केली आहे . जिल्ह्यातील सर्व वारकरी साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचं आवाहन जिल्हाध्यक्ष ह भ प श्रीहरी चौरे यांनी केली आहे .

शनिवार दि. २० जुलै २०२५ रोजी स्वामी समर्थ मंदिर शाहुनगर धाराशिव येथे जिल्ह्यातील वारकरी साहित्य परिषद अंतर्गत जनाई, मुक्ताई ,बहीनाई हरिपाठ मंडळाची बैठक आयोजित केली आहे . या बैठकीमध्ये जनाई मुक्ताई बहीनाईच्या विचाराची जाणीव जागृती करण्यासाठी व इतर काही महत्त्वपूर्ण विषयावर महत्त्वपूर्ण नियोजन करण्यासाठी व्यापक बैठक आयोजित केली आहे.

या बैठकीसाठी जिल्ह्यातील सर्व वारकरी साहित्य परिषदेच्या जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी हरिपाठ मंडळाचे अध्यक्ष व सर्व महिला व पुरुष तालुका प्रमुखांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वारकरी साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष ह भ प श्रीहरी चौरे महाराज यांनी केले आहे .



### आपलं घर येथे कार्यक्रम

### रिपाइं (आठवले)चे आनंद पांडागळे यांचे प्रतिवादन

# अनाथाचा नाथ म्हणजे थोर समाजवादी नेते पन्नालाल भाऊ सुराणा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड): सन १९९३च्या लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे झालेल्य प्रलंयकारी भुकंपात धाराशिव जिल्हयातील उमरगा- लोहारा तालूक्यातील अनेक गांव जामिनदोस्त होऊन अनेक बालकांचे आई वडिल दगावल्याने असा अनाथ झालेल्या बालकाना अधार देण्यासाठी राष्ट्रसेवा दलाच्या माध्यतून जेष्ठ समाजवादी नेते भारतिय संविधनाचे अभ्यासक पन्नालाल भाऊ यांच्या पुढाकारातून आलियाबाद नळदुर्ग येथ बाघाट पर्वत रांगेच्या ओसाड माळरानावर आपल घर बालकाश्रमाची निर्मिती करून . अनाथ मुलाना अधार देणाचे तेंव्हा पासून ते आजतागायत फार मोठे सामाजिक कार्य करणारे ९३ वर्षीय पन्नालाल भाऊ सुराना म्हणजे अनाथाचा नाथ आहेत.तेंव्हा आपल घर येथिल विद्यार्थानी स्वत:ला कधिही अनाथ समजूनये असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे मराठवाडा विभाग कार्याध्यक्षक आनंद पांडागळे यानी आपल घर येथे आयोजित कार्यक्रमात बोलाताना केले.

विद्यालयीन शिक्षण घेत असतानाच आईचे छत्र हरवलने आईविना अनाथ झालेले, रिपाइं (आठवले ) पक्षाचे नुतन तालूका अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे राज्य कार्यकारणी सदस्य जळकोट ता.तुळजापूर येथील अरुण लोखंडे यांचे पिताश्री कै. नारायाण तुकाराम लोखंडे यांच्या प्रथम स्मृती दिनाच्या निमित्ताने आदरांजली सभा आणि आपल घर नळदुर्ग येथिल शालेय अनाथ मुलाना भोजन दान असा संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन लोखंडे परिवारांच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाइं (आठवले) चे मराठवाडा विभाग कार्याध्यक्ष आनद पांडागळे हे होते व प्रमुख मार्गदर्शक म्हणून पन्नालाल भाऊ सुराना हे होते तर प्रमुख पाहुणो म्हणून जेष्ठ कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी, मुख्याध्यापक अनिल सोनकांबळे (लातूर),बाल कल्याण समिती धाराशिवनचे सदस्य दयानंद काळूंके, रिपाइं (आठवले ) जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, रिपाइं (आठवले) चे नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे, अणदुरचे माजी सरपंच प्रबोध कांबळे,आदी होते.

प्रारंभी कै.नारायण लोखंडे (आण्णा) यांच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून आदरांजली वहाण्यात आली.त्यानंतर येथिल शालेम अनाथ विद्यार्थ्याना सह भोजन दान देण्यात आले. लोखंडे परिवारांच्या वतीने आपल घर येते राबविण्यात आलेल्य या उपक्रमा बाबत जेष्ठ समाजावादी नेते पन्नालाल भाऊ सुराना यानी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन रिपाइं(आठवले) चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड यानी केले.

या प्रसंगी रिपाइंचे नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे, प्रमाणित लेखापरिक्षक चंद्रकांत शिंदे, सामाजिक कार्यकर्ते जयभिम वाममारे, धर्मराज देडे, महादेव मोरे, राहुल लोखंडे, प्रा.नितीन लोखंडे,आरविंद लोखंडे,परमेश्वर लोखंडे,प्रदिप लोखंडे,विशाल लोखंडे, अंगद लोखंडे आपल घरचे विलास वकिल,एस.आर.चवले सह विदयार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

# डॉ. विजय चऱ्हाटे यांना राज्यस्तरीय भिमरत्न पुरस्कार देऊन सन्मानीत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

बुलढाणा- मेहकर येथील वैद्यकिय क्षेत्रातील देवमाणुस मेहकरचे सुप्रसिध्द डॉ.विजय चऱ्हाटे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्ताने सर्व मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय भिमरत्न पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या व सर्व मित्रपरिवाराच्या वतीने अभिष्टचिंतन सोहळ्याचे मातोश्री हॉस्पिटल मेहकर येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई हे होते. यावेळी आपल्या अध्यक्ष भाषणातून तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई म्हणाले डॉक्टर पेशा हा लोकांना जीवदान देणारा असून या पेशामध्ये प्रामाणिकपणा अतिशय महत्त्वाचा असतो. रुग्णांची सेवा हीच ईश्वर सेवा असे मानून आपले सर्वस्व समाज हितासाठी जोपासणारे डॉ.विजय चर-हाटे साहेब वैद्यकीय क्षेत्रातील अनमोल हिरा आहे. त्यांचे आपण जतन केले पाहिजे असे प्रतिपादन याप्रसंगी त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यत करत साहेबांना वाढदिवस निमित्ताने शुभेच्छा दिल्या.

### मेहकर शहरातील वैद्यकीय क्षेत्रातील देवमाणुस एक उभरता अनमोल हिरा : संदिप गवई

यावेळी, संदिप गवई, गजानन सरकटे, रविंद्र वाघ, अख्तर करेशी, संदिप राऊत, प्रकाश सुखधाने, कुणाल माने, देवानंद वानखेडे, इलीयास कुरेशी, नबी कुरेशी, यावेळी समस्त मान्यवर व मित्रपरिवार उपस्थित होते.

## थोडक्यात...

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १५ जुलै रोजी सायंकाळी हॉटेल मधुबन समोर घडली. याप्रकरणी कल्लप्पगोडा गौडगौडा पोलीस पाटील (वय-२५,रा.येकतापूर, तासुरपूर ,जि. यादगिर राज्य कर्नाटक) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की फिर्यादीचा भाव नीलकंठ यास अज्ञात वाहन चालकाने धडक दिल्याने तो जखमी होऊन बेशुद्ध अवस्थेत मिळून आल्याने त्याच उपचारास पोलिसांनी सिव्हिल हॉस्पिटल सोलापूर येथे दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला आहे. तसेच अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवून फिर्यादी यांचा भाऊ नीलकंठराय याला जोऱ्याची धडक देऊन गंभीरजणी करून निलंकठराव गौडपगौडा यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

### त्रासाला कंटाळून एकाने घेतला गळफास; दोघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) त्रासाला कंटाळून गळफास घेतल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १५ जुलै रोजी दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास सलगर वस्ती डोणगाव रोड येथे घडली.याप्रकरणी अंजना दादाराव शिंदे (वय-५३,रा.पाटील चाळ,मुरारजी पेठ, सध्या दमानी नगर,पावन गणपती मंदिराच्या मागे) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून शकलेस जाधव व अरुण रोडगे (दोघे रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,सलगर वस्ती डोणगाव रोड येथील फिर्यादी यांची बहीण शहाबाई रमेश जगताप यांच्या घरी फिर्यादी यांचा मुलगा आनंद दादाराव शिंदे (वय-३६-,रा.दमानी नगर, पावन गणपतीच्या मागे) याने शकलेस जाधव व अरुण रोडगे यांच्या त्रासाला कंटाळून घराच्या छताच्या वाशाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन मयत झाला आहे.म्हणून फिर्यादी यांनी शकलेश जाधव व अरुण रोडगे यांच्याविरुद्ध फिर्याद दिली आहे.पुढील तपास पोसई.कुतवळ हे करीत आहेत.

'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी' व 'राष्ट्रीय सरपंच संसद' तर्फे

# श्री क्षेत्र आळंदीत 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदे'चे आयोजन

## ६० कीर्तनकार व १५० सरपंच होणार सहभागी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : 'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे' व 'एमआयटी-राष्ट्रीय सरपंच संसद' यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषद'१९ व २० जुलै २०२५ रोजी हनुमानवाडी आळंदी (देवाची) येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत संपूर्ण महाराष्ट्रातील ६० कीर्तनकार आणि १५० सरपंच सहभागी होणार आहेत. अशी माहिती परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील, हभप यशोधन महाराज साखरे आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून ही गोलमेज परिषद होत आहे.

या परिषदेचा शुभारंभ शनिवार, १९ जुलै रोजी दुपारी ३.०० वा. होणार आहे. या समारंभासाठी राज्याचे अन्न व औषधे प्रशासन विभागाचे मंत्री श्री.नरहरी झिरवाळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच या सत्रात विधान परिषदेचे सदस्य श्री. श्रीकांत भारतीय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, खांडबहाले डॉट कॉम चे निर्माते डॉ. सुनिल खांडबहाले हे सन्माननीय वक्ते म्हणून उपस्थित राहतील. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

तसेच २० जुलै रोजी होणार्या वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनाची वाटचाल या विषयावर सकाळी ९.३० वा. होणार्या तृतीय सत्रामध्ये राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सामाजिक कार्य मंत्री आशिष शेलार हे प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून उपस्थित राहतील. या वेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सल्लागार वैभव डांगे व अभय टिळक उपस्थित राहणार आहेत.

वारकरी संप्रदायाची २१व्या शतकातील सामाजिक प्रबोधनाची दिशा, स्वरूप, समस्या व आव्हाने आणि निराकरणाची संभाव्य कृतिशील उपाययोजना हा या परिषदेचा प्रमुख विषय असणार आहे. परिषदेत वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून होत असलेले मौलिक लोककल्याणाचे कार्य, आध्यात्मिक प्रबोधनाबरोबरच लोक जीवनातील विविध दैनंदिन समस्यांच्या निराकरणासाठी अधिकाधिक कसे उपयोगी होईल. या विषयावर विविध अंगाने विचारमंथन करून सामाजिक प्रबोधनाचे नवीन विषय व कार्याची निश्चित दिशा ठरविली जाणार आहे. वारकरी संप्रदायाच्या प्रबोधन कार्याच्या विस्ताराला सहाय्यभूत होणे हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे.

उद्घाटनानंतर दोन दिवसात एकूण चार सत्रात ही परिषद संपन्न होईल. '२१ व्या शतकातील प्रमुख सामाजिक समस्यांचे स्वरूप व आव्हाने', 'वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनाची लोककल्याणकारी वाटचाल', 'वारकरी संप्रदाय-२१व्या शतकातील प्रबोधनाचे स्वरूप, समस्या व आव्हाने' 'वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनातील आव्हाने व समस्या निराकरणाची संभाव्य उपाययोजना' या विषयावर सत्रे होतील. महाराष्ट्र राज्यातून ख्यातनाम कीर्तनकार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व आदर्श सरपंच या परिषदेत आपले मौलिक स्वरूपाचे विचार व्यक्त करतील.

परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील यांनी सांगितले की, 'एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल कराड यांच्या मातोश्री, वारकरी सांप्रदायाच्या नि:स्सीम अनुयायी, तत्त्वदर्शी कवयित्री सौ.उर्मिलाताई कराड यांचा २० जुलै २०२५ हा तृतीय स्मृतिदिन आहे. 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदे'त त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल. आयोजित पत्रकार परिषदेत एमआयटी स्कूल ऑफ एज्युकेशनच्या प्रभारी प्राचार्या डॉ. शलिनी टोणपे आणि राष्ट्रीय सरपंच संसदेचे सह समन्वयक प्रकाश महाले उपस्थित होते.

## निफाड महाविद्यालयात जागतिक सर्प दिन साजरा

### सर्प दिनानिमित्त विद्यार्थी आणि सेवकांमध्ये जनजागृती होण्यासाठी प्रात्यक्षिकपर व्याख्यान आणि प्रशिक्षण संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सापाविषयी समाजात अनेक गैरसमज, भीती आणि अंधश्रद्धा पसरलेल्या आहेत, पण आजचा दिवस हा त्या गैरसमजांना दूर करण्यासाठी आणि सर्प हा निसर्गातील अत्यंत महत्त्वाचा जीव आहे त्याबद्दल योग्य माहिती पोहोचवण्यासाठी एक उत्तम संधी आहे. भारतामध्ये ४०० पेक्षा जास्त सापाच्या प्रजाती आढळतात त्यातून महाराष्ट्रात एकूण ५२ प्रजाती आढळतात त्यातही १३ प्रजाती ह्या विषारी आहेत म्हणून साप त्याचा रंग, लाबी आणि त्याच्या हालचाली याविषयी नागरिकांनी जाणून घेतल्यास निश्चितच धोका कमी होऊन सुरक्षितता वाढू शकेल असे प्रतिपादन ए.आर.ए.ई.एस. फाउंडेशनचे संचालक सर्पमित्र सुशांत रणशूर यांनी यावेळी केले.

मविप्र समाजाचे कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयात १६ जुलै रोजी जागतिक सर्पदिना निमित्त ए.आर.ए.ई.एस. फाउंडेशन, राष्ट्रीय सेवा योजना व प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक सर्प दिन जनजागृती कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. सुशांत रणशुर यांनी पुढे म्हटले जर एखाद्या व्यक्तीस सर्पदंश झाल्यास त्यावर प्रथमोपचार कसा करावा व व्यक्तीचा जीव कसा वाचेल याविषयी सखोल माहिती देत काही सोपी प्रात्यक्षिके करून दाखवली.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी सांगितले की, सर्प हा आपल्या पर्यावरणाचा एक अत्यंत उपयुक्त घटक आहे तो उंदीर, बेडूक यांसारख्या आणि इतर घटकांचे प्रमाण निसर्गात नियंत्रित ठेवतो, तसेच सापविषयीची शास्त्रशुद्ध माहिती विद्यार्थी आणि नागरिकांपर्यंत पोहचली तर त्यातून पुढे घडणारे अनेक धोके टाळता येतील यासाठी आजचा कार्यक्रम व्याख्यान आणि प्रात्यक्षिक हे खूपच मौलिक आणि माहितीपूर्ण आहे यातून निश्चितच मोठी जनजागृती होईल असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमास प्रात्यक्षिके करून दाखविण्यासाठी समवेत हेमंत वानले, राजेश शेजवळ, सचिन नागरे ,अमोल सोनवणे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पल्लवी खपरे खापरे यांनी केले. आभार श्रीमती मोनिका बोराडे यांनी मानले तर प्रास्ताविक प्रा. भाऊसाहेब मूनतोडे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

## वैभवसंपन्न राष्ट्राच्या उभारणीत उद्योगवर्धिनी संस्थेचा सिंहाचा वाटा : सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

### उद्योगवर्धिनीच्या २१ व्या वर्धापन दिन सोहळ्यात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची उपस्थिती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : समाजातील दुःख ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याची प्रेरणा आहे. हीच धारणा घेऊन स्त्री सक्षमीकरणासाठी प्रचंड मोठे कार्य करणाऱ्या उद्योगवर्धिनी संस्थेचा वैभवसंपन्न राष्ट्राच्या उभारणीत सिंहाचा वाटा ठरणार आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी गुरुवारी सोलापुरात केले. उद्योगवर्धिनी संस्थेचा परिवार उत्सव कार्यक्रम हुतात्मा स्मृती मंदिरात उत्साही वातावरणात झाला. महिला सक्षमीकरणासाठी अखंड कार्यरत असलेल्या उद्योगवर्धिनी संस्थेला २१ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी, सेवाभारतीचे सोलापूर शहर अध्यक्ष राजेश पवार, उद्योगवर्धिनी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा चंद्रिका चौहान, सचिवा मेधा राजोपाध्ये उपस्थित होते.

यावेळी डॉ. भागवत म्हणाले, राष्ट्राला मोठे करण्यासाठी सर्व समाजाने स्वार्थ, भेद विसरून एकत्र काम करण्याची आवश्यकता आहे. सेवा करणारा नेहमी दुःखी व्यक्तीला दुःखातून बाहेर काढून त्याला दुसऱ्याला मदत करण्यासाठी प्रवृत्त करतो. उद्योगवर्धिनीचे दुःख निवारणाचे कामही असेच अहंकार विरहित, सहजकर्तव्य भावनेचे आणि आपलेपणाचे आहे. समाजाच्या प्रगतीत महिलांचा वाटा सर्वात मोठा असतो. महिला घटक उन्नत होणे ही राष्ट्राच्या उत्कर्षासाठी आवश्यक बाब आहे. तर संपूर्ण समाजाचा उद्धार करते उद्योगवर्धिनी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे, असेही सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले.

## निफाड तालुक्यात ३० शिव रस्ते झाले खुले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : तालुक्यामध्ये अनेक ठिकाणी शेतामध्ये जाण्यासाठी रस्ते नव्हते जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार तहसीलदार विशाल नाईकवाडे व त्यांच्या टीमने तालुक्यातील ३० गावांचे बंद असलेले शिव रस्ते पुन्हा सुरू करून दिले त्यामुळे शेतात जाण्याची शेतकऱ्यांची अडचण दूर झाली आहे.

अनेक वर्षापासून शेत रस्त्यांचा प्रश्न निकाली निघत नव्हता तो गेल्या सहा महिन्याभरापासून तहसीलदार विशाल नाईकवाडे व त्यांच्या टीमने लोकांच्या तक्रारी ची दखल घेत सुमारे ३० गावांच्या रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावून हे रस्ते वहिवाटीत रूपांतरित करून दिले त्यामध्ये ओने, कसबे सुकेने, वडाळी नजीक, शिरसगाव, नारायणगाव, खेडले झुंगे, कोळगाव, नांदूर मधमेश्वर, सोनेवाडी, रामपूर, सोनेवाडी बु, रौळस, पालखेड,दावचवाडी, आहेरगाव,पाचोरेवणी,उंबरखेड,रानवड,नांदुर्डी,उगाव, गोंदेगाव,विष्णू नगर, रामनगर, औरंगपूर, तळवाडे, मांजरगाव, शिंगवेआधी गावांचा समावेश आहे.

निफाड तालुक्यातील अनेक ठिकाणी शेतात जाण्यासाठी असलेले शिवरास्ते बंद झालेले होते ते खुले करण्यात आले आहे, असे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी सांगितले.

शिवसेना, मनसे व इतर संघटनांनी केले आंदोलन

मागण्या पूर्ण होत नाही तो पर्यंत पडघा टोल नाका बंद ; पोलिसांचा चोख बंदोबस्त

# विविध मागण्यासाठी पडघा टोल नाक्यावर जोरदार निदर्शने



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

मुंबई-नाशिक महामार्गावरील पडघा टोल नाक्यावरील टोल वसुली शिवसेना ठाकरे गट व महाराष्ट्र नवनिर्माण सेना व इतर तसेच इतर संघटना यांनी आंदोलन करून टोल वसुली बंद पाडली आहे. तर महामार्ग प्राधिकरणाने जिल्हाधिकारी ठाणे यांच्यासोबत आंदोलकांची जोपर्यंत बैठक होत नाही तोपर्यंत टोल नाका सुरू न करण्याचा इशारा यावेळी आंदोलकांनी दिल्याने सध्या पडघा टोलनाक्यावर टोलवसुली बंदच आहे.

पडघा टोल नाका विरोधात विविध संघटना गेली तेरा वर्षे संघर्ष करत असलेल्या विविध कामांच्या मागण्यांसाठी भिवंडी, शहापूर ,कल्याण तालुक्यातील सर्व शिवसेना (ठाकरे गट) महाराष्ट्र नवनिर्माण सेना इतर सामाजिक संघटना आक्रमक झाल्या होत्या. पडघा टोल नाका रस्ता व त्या लगत असलेल्या सर्विस रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करणे. परिसरातील शेरेकर पाडा, डोहोळे, कोशिंबी, बोरिवली, भादाणे सर्व्हिस रोड बनवणे व रोडची दुरुस्ती करणे. शेरेकर पाडा येथे अंडर पास बनवणे. भादाणे अंडरपास रस्त्यात पाणी साचत आहे. रस्ता पुर्णपणे खड्डेमय झाला आहे त्याची दुरुस्ती करणे. तळवली अंडर पासचा टेंडर २ वर्षापुर्वी निघाला असून सदरील काम लवकरात लवकर करणे. पडघा, कल्याण रस्त्यावरील सापे, तळवली, वाशेरे, आमने, सावद रस्त्यावर खुप खड्डे पडले आहेत. त्यामुळे सदर रस्त्यावर खुप अपघात होत आहे. त्याची लवकर दुरुस्ती व्हावी.

गेल्या १५ वर्षापासून रस्तांसंदर्भात मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत पडघा टोलनाका बंद ठेवणे. भोईरपाडा येथे अंडरपास करणे, साईधारा गोडाऊन येथील अंडरपास तयार करणे, वाहूळी येथील सर्व्हिस रस्त्याची दुरुस्ती करुन सांडपाण्याची व्यवस्था करणे, पडघा येथील एन. एच.०३ लगत गटारीची व्यवस्था करणे. पडघा अंडरपास तयार करणे ( भिवंडी कडून येणारा) मौजे बोरीवली रस्ता व अंडरपास तयार करणे. कासणे व कांदली येथे अंडरपास तयार करणे. भिवंडी ते शहापूर एन. एच ०३ चे रस्ते. अपूर्ण राहिलेले ब्रिज पूर्ण करणे अशा एकूण १६ मागण्यांचे निवेदन भिवंडी तहसीलदार अभिजीत खोले, प्रकल्प राष्ट्रीय महामार्गाचे संचालक श्रीकांत गगे, सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी यांना देण्यात आले. जो परत आमच्या मागण्या पूर्ण होत नाही. तो पर्यंत पडघा टोल नाका आम्ही सुरू होऊ देणार नाही.असे यावेळी उपस्थित मोर्चामध्ये सामिल झालेल्या पदाधिकाऱ्यांनी बोलतांना सांगितले.

सदर मोर्च्यात शिवसेना ( ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर , मनसेचे जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी , सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे, शिवसेना उपनेत्या ज्योती ठाकरे, शिवसेना उपनेते विश्वास थळे, शिवसेना जिल्हाध्यक्ष कुंदन पाटील , संपर्क प्रमुख साईनाथ तारे , महादेव घाटाळ, हनुमान पाटील, मनसे प्रदेश उपाध्यक्ष डी. के . म्हात्रे, संघटक मदन (आण्णा) पाटील, शिवसेना प्रवक्ते अनिश गाडवे, रा. काँ. तालुका अध्यक्ष गणेश गुळवी , शिवसेना ( ठाकरे गट) शहापूर तालुका प्रमुख बाळा धानके, अँड संदीप जाधव ,शिवसेना उपतालुका प्रमुख रघुनाथ पाटील,शिवसेना पडघा शहर प्रमुख संजय जाधव, पडघ्याचे सरपंच रविंद्र विशे, संजय जाधव, संजय पटेल, निवृत्ती मगर , गुरुनाथ मोरे, राजाराम कथोरे तर पडघा , भिवंडी शहापूर,परिसरातील शिवसेना ठाकरे गटाचे,मनसेचे तर विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पडघा टोल नाका परिसरात पोलिस तैनात करण्यात आले होते.

यावेळी ठाणे ग्रामीण गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे,पडघा पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी सुमारे चारशे पोलिसांचा फौजफाटा बंदोबस्ताकरिता उभारला होता. दोन वर्षापूर्वी खडवली फाटा येथे झालेल्या अपघातात पडघ्यातील सहा जणांचा मृत्यू झाला होता. त्यापैकी काही पालकांनी संतप्त प्रतिक्रिया यावेळी महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांसमोर व्यक्त केल्या.